## इयत्ता : बारावी [ STD. XII] : मराठी (109) [ Marathi ]
## नमुना प्रश्न-पत्रिका : 22 – 23 [Sample paper : 2022 – 23 ]

वेळ : 3 तास                                                                 एकूण गुण : 80

**सर्वसाधारण सूचना :**

1. या प्रश्नपत्रिकेत - अ,ब,क,ड – असे चार विभाग आहेत.
2. सर्व विभाग आवश्यक आहेत.
3. यथाशक्य सर्व विभागाची उत्तरे क्रमाने यावीत.
4. एकाच विभागातील सर्व प्रश्नांची उत्तरे क्रमानेच यावीत.

### विभाग : अ : आकलन (15)

**प्रश्न 1) पुढील परीच्छेद लक्षपूर्वक वाचा आणि त्याआधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा .**

डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम राष्ट्रपती झाल्यापासून त्यांना पारितोषिके आणि पदवी देण्यासाठी विनंतींचा पाऊस पडू लागला होता. कित्येक सरकारी संस्था आणि स्थानिक प्रशासकीय संस्था यांनी रस्ते, शाळा, रुग्णालये, वाचनालये आणि इतर इमारतींना त्यांचे नाव देण्यासाठी विनंती पाठवल्या होत्या. एक व्यक्ती म्हणून अशा संस्थांना डॉ.कलाम यांच्याविषयी आदर आणि पूज्यभाव वाटत असला तरीही या विनंती आपल्याला मिळालेल्या पदामुळे करण्यात येत आहेत, असा डॉ.कलामांचा याविषयीचा दृष्टिकोन होता. त्यामुळे त्यांनी निग्रहाने आणि सातत्याने अशा सर्व विनंती नाकारल्या. राष्ट्रपती डॉ.कलाम यांच्याकडे उच्च नैतिक मूल्ये आणि व्यावसायिक शिष्टाचार होते. सहसा लोकांना सत्तेच्या किंवा अधिकाराच्या जागा मिळाल्या, की आपल्या मूळ ठिकाणांकडे ते अधिक लक्ष पुरवू लागतात. तिथे संस्था स्थापन करून विविध प्रकारच्या सुविधा पुरवून किंवा तिथे राजवाड्यासारख्या इमारती बांधून किंवा गरजेहूनही अधिक वेळा वारंवार तिथे भेटी देऊन ते आपले त्याठिकाणी जास्त लक्ष असल्याचे दाखवून देतात. डॉ. कलाम यांनी भारताच्या बहुतांश भागांना भेटी दिल्यानंतरच आपला पहिला परदेशदौरा केला. संपूर्ण देशाचा दौरा केल्यानंतरच आपण परदेशी जाऊ असे त्यांनी मला एकदा सांगितले होते, परंतु आपल्या या योजनेपासून त्यांना थोडेसे ढळावे लागले; कारण परदेशदौऱ्याचे नियोजन बरेच आधी करावे लागते. त्यामुळेच डॉ. कलाम यांनी पहिला परदेशदौरा केला त्या आधी 25 राज्यांना आणि 3 केंद्रशासित प्रदेशांना भेटी दिल्या होत्या.27 देशांनी बनलेल्या युरोपियन संसदेसमोर बोलण्यासाठी डॉ.कलाम यांना 25 एप्रिल 2007 रोजी बोलावण्यात आले होते. त्यांना बोलण्यासाठी 25 मिनिटे वेळ दिला होता.

युरोपियन संसदेसमोर प्रथमच एक भारतीय राष्ट्रपती बोलणार होते. तो एक लक्षणीय प्रसंग होता.त्यामुळे व्याख्यानासाठी दिली गेलेली वेळ वाढवून आम्हाला तो प्रसंग बिघडवायचा नव्हता. आपण सतत करत असलेल्या आठवणीमुळे कलामसाहेबांना आपली चीड येईल, असे वाटत असूनही तो धोका पत्करून मी त्यांना भाषण वेळेवरच संपवण्याची शक्य तितक्या वेळा आठवण करून देत राहिलो. 25 ऐवजी 26 मिनिटांच्या भाषणामुळे त्यांना किंवा देशालाही प्रशंसा प्राप्त होणार नव्हती किंवा कोणाच्याही कीर्तीत भर पडणार नव्हती. परराष्ट्र सचिव शिवशंकर मेनन यांनीही त्यांना तीच गोष्ट सांगितली .परराष्ट्र खात्यातील (पश्चिम) सचिव नलीन सुरी यांनी राष्ट्रपतींना तोच सल्ला दिला. डॉ.कलामांनी सर्वांचे सल्ले शांतपणे ऐकून घेतले होते.

**प्रश्न : अ)** खालील प्रश्नांची उत्तरे योग्य पर्याय निवडून लिहा. **(3X 1=3)**

I) सरकारी संस्था व स्थानिक संस्थांनी कलामांना कशासाठी विनंत्या केल्या ?

A] संस्थांना भेट देण्यासाठी.

B] संस्थांना त्यांचे नाव देण्यासाठी

C] पद ग्रहण करण्यासाठी

D] देणगी देण्यासाठी.

II) डॉ. कलामसाहेबांनी परदेश दौरा कधी केला ?

A] संपूर्ण भारत दौरा केल्यानंतर

B] भारताच्या बहुतांश भागाला भेट दिल्यानंतर.

C] रामेश्वरमला भेट दिल्यानंतर.

D] संपूर्ण भारत दौरा करण्याआधी

III) युरोपियन संसदेसमोर डॉ. कलाम यांनी 25 मिनिटेच बोलावे असा सचिवांचा आग्रह होता,

कारण ..

A] त्यांना दिलेली वेळ वाढवणे हितकारक होते.

B]यापेक्षा अधिक वेळ कलामसाहेबांकडे नव्हता.

C] अधिक वेळ बोलण्याने देशाचा काही फायदा नव्हता.

D] त्यांना संसदेसमोर बोलण्याचा सराव नव्हता.

**ब)** पुढील प्रश्नांची 30 / 35 शब्दांत उत्तरे लिहा . **(2X2=4)**

I) अधिकाराच्या जागा मिळाल्यानंतर लोक अगोदर कोणत्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करतात?

II) डॉ.कलाम यांना आपल्या योजनेपासून का ढळावे लागले ?

क) पुढीलपैकी एका प्रश्नाचे उत्तर सुमारे 40 / 45 शब्दांत लिहा. (1X3=3)

I) 'डॉ.कलाम यांच्याकडे उच्च नैतिक मूल्ये आणि व्यावसायिक शिष्टाचार होते.' असे का म्हटले आहे ?

**प्रश्न 2 : खालील कविता वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा.**

होता डोंगरमाथ्यास पडला धोंडा भला थोरला ;
वर्षे कैकही लोटली तरी न तो हाले मुळी आपूला !
आनंदी फुलवेल एक जवळी होती सुखे रहात ;
बाळे सांजसकाळ हासत तिची तैशीच कोमेजता !
थटटेखोर फुले हसुनी वदली धोंड्यास ती एकदा,
धोंडा केवळ तू ! अरे, न जगती काही तुझा फायदा !
संतापून तयास फत्तर म्हणे, का ही वृथा बोलणी ?
सारी सुंदरता इथेच तुमची जाईल रे, वाळुनी !
धोंड्याच्या परि काळजास भिडले ते शब्द जाऊनिया;
काळाठिक्कर यामुळे हळूहळू तो लागला व्हावया .
पुष्पांच्या कवळ्या मनातही सले ते फत्तराचे वच;
गेली तोंडकळा सुकून पडली ती पांढरी फारच !
कोणी त्या स्थळी शिल्पकार मग तो ये हिंडता हिंडता,
त्याच्या स्फुर्तीस फत्तरात दिसली काहीतरी दिव्यता;
त्याची दिव्यकलाकरांगुली न जो त्या फत्तरा लागली ,
श्रीसौंदर्यमनोरमा प्रगटूनी साक्षात उभी राहिली !
वेडा पीर असाच गुंतत कुणी एकाकी ये त्या स्थळा,
ती मूर्ती बघताच तो तर खुळा नाचावया लागला !
त्याने ती खुडूनी फुले भरभरा पायी तिच्या वाहिली,
तो,त्यांची फुलुनी कळी खदखदा सारी हसू लागली !
लावण्यकृती ती वनात अजुनी आहे उभी हासत,
पुष्पेही बसलीत ती बिलगुनी पायी तिच्या खेळत !

अ) खालील प्रश्नांची उत्तरे दिलेल्या पर्यायामधून निवडून लिहा. (2x1=2)

) धोंडा संतापून फुलांस काय म्हणाला ?

A) तुम्ही मरून जाल B) तुम्ही वाळून जाल

C)तुमचा काय फायदा D) यांपैकी सर्वच.

) शिल्पकारास त्या दगडात काय दिसले ?

A) दिव्यता B) स्फूर्ती

C) फुले D) फत्तर

ब) खालील प्रश्नांची उत्तरे 15 / 20 शब्दांत लिहा. (3X1=3)

) बाळे कोणास म्हटले आहे ?

) धोंडा काळाठिक्कर का पडला ?

) वेड्या पीराने काय केले ?

## विभाग ब (15)

**प्रश्न 3 : खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर 300 ते 325 शब्दांत निबंध लिहा. (1X10=10)**

) कोरोना पिडीताची आत्मकथा

) मी पाहिलेला क्रिकेटचा सामना

) प्लास्टिक मुक्त भारत

) मी मुख्यमंत्री झालो तर ...

**प्रश्न 4 : तुमच्या शाळेत झालेल्या 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' या कार्यक्रमाचे अहवाल लिहा.**

**किंवा** **(1X5=5)**

**'मोठ्या शहरातील वाढते प्रदूषण' या संबंधी एक वृत्तलेख लिहा.**

## विभाग क : व्याकरण (25)

**प्रश्न 5. सूचनांप्रमाणे उत्तरे लिहा.**

**अ)** पुढील शब्दांसाठी दिलेल्या पर्यायापैकी अचूक समानार्थी शब्द लिहा. (कोणतेही 3)

**(3x1=3)**

) वासरमणी

A) चंद्र B) रत्न

C) सूर्य D) हिरा

) निकड

A) गरज B) जवळ

C) अनावश्यक D) निवड

) क्रोध

A) जाळ B) राग

क] द्वेष ड] चीड

) सोहळा

A) कार्यक्रम B) सण

C) सभा D) उत्सव

**आ)** योग्य पर्याय निवडून पुढील समास ओळखा. (कोणतेही 2) **(2x2=4)**

I) शब्दकोश

A) विभक्ती तत्पुरुष B) कर्मधारय

C) द्वंद्व समास D) द्विगू समास

II) पुढीलपैकी कोणते पद द्विगू समास आहे ?

A) परमेश्वर B) पंचधातू

C) सुखदुःख D) दहावीस

III) पुढीलपैकी कोणते पद अव्ययीभाव समास आहे ?

A) महात्मा B) दरवर्षी

C) ताणताणाव ड] गप्पागोष्टी

IV) गुणदोष

A) कर्मधारय समास B) द्वंद्व समास

C) विभक्ती तत्पुरुष D) द्विगू समास

**इ)** पुढील वाक्यांचा प्रयोग ओळखा किंवा सूचनेनुसार वाक्याचा प्रयोग बदला.

(कोणतेही 3) **(3x2 =6)**

I) चिनी सैनिकांनी गोळीबार केला. (प्रयोग ओळखा)

II) देवकीने गाणे खूप सुंदर गायिले. (कर्तरी करा.)

III) कप्तानाने सैनिकांना सूचना दिल्या. (प्रयोग ओळखा)

IV) ती हलकेच खिडकी उघडते. (कर्मणी करा.)

**ई)** वाक्य प्रकार ओळखा किंवा सूचनेनुसार वाक्यप्रकार बदला. (कोणतेही 3)

**(3x2 =6)**

I)'किती मनापासून हसतात ती लहान मुलं !' – या वाक्याचे विधानार्थी वाक्य आहे .....

A) ती लहान मुलं खूप मनापासून हसतात.

B) ती लहान मुलं मनापासून हसतात का ?

C) त्या लहान मुलांनी खूप मनापासून हसावे.

D) लहान मुलांनो मनापासून हसा.

II) 'या वर्षीच्या पावसाने खूप नुकसान झाले.' – या वाक्याचे प्रश्नार्थी वाक्य असेल ......

A) या वर्षीच्या पावसाने काय कमी नुकसान झाले का ?

B) किती नुकसान केले या वर्षी पावसाने !

C) या वर्षीच्या पावसाने खूप नुकसान व्हावे.

D) या वर्षीच्या पावसाने काहीच लाभ मिळाला नाही.

III) 'आपला परिसर स्वच्छ ठेवावा.' – हा वाक्यप्रकार आहे ....

A) प्रश्नार्थी B) विधानार्थी

C) विध्यर्थ D) आज्ञार्थ

IV) 'ही कल्पना चांगली आहे.' – हा वाक्यप्रकार आहे .....

A) नकारार्थी B) विध्यर्थ

C) प्रश्नार्थी D) होकारार्थी

V) 'तू नियमित सराव कर.' - हा वाक्यप्रकार आहे ......

A) उद्गारवाचक B) विध्यर्थ

C) आज्ञार्थ D) होकारार्थी

३) खाली दिलेल्या वाक्यातील अधोरेखित शब्दसमूहाऐवजी कंसातील योग्य अर्थाच्या वाक्प्रचाराचाउपयोग करा. (कोणतेही तीन) **(3 x 2 = 6)**

[वाक्प्रचार - नजर ठेवणे, दातखिळी बसणे, आभाळाकडे डोळे लावणे. दोघात सख्य नसणे. बळ लावणे. जमीनअस्मानाचे अंतर असणे. ]

I) मृग नक्षत्र सुरु होताच शेतकरी आतुरतेने पावसाची वाट पाहतो.

II) मुलांनी आपली ताकद लावली अन् शेवटी ती खिडकी उघडली.

III) पश्चिमी संस्कृती आणि भारतीय संस्कृती यात मोठीच तफावत आहे.

IV) ती अवाढव्य काळी आकृती पाहून उषाकाकूला खूप भीती वाटू लागली.

V) तात्या बँकेतून रक्कम घेऊन बाहेर पडले, परशा त्यांच्यावर लक्ष ठेऊन होताच.

. **विभाग : ड : गद्य–पद्य पाठ आणि उपयोजित लेखन (25)**

**प्रश्न 6: गद्य-पाठांधारे पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

अ) योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा. **(3X1=3)**

I) 'शोध' कथेत कोणत्या नोटेचा शोध सुरु होता ?

A) डॉलरच्या

B) शंभर रुपयाच्या

C) हरवलेल्या दोन हजाराच्या

D) पेशंट मुलीने दिलेल्या एक रुपयाच्या

II)'मराठी भाषेला दातांविषयी आदर नाही.' असे लेखकाचे मत आहे, कारण .....

A) मराठीत दातांसंबंधी म्हणी नाहीत.

B) दातात तृण धरून शरण जावे लागते.

C) मराठीत दातासंबंधी मंगल भावना व्यक्त करणारा एकही शब्दप्रयोग नाही.

D) दात पाडून घशात घातले जातात.

III) आनंद जितका सहजपणे घ्याल तितका तो .......

A) हातातून निसटतो.
B) हुलकावण्या देतो
C) सहजपणे मिळतो.
D) दडून बसतो.

ब) पुढीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची प्रत्येकी सुमारे 35/40 शब्दांत उत्तरे लिहा. **(2 X 2=4)**

I) 'रेशीमबंध' पाठात उत्तररात्रीच्या आगमनाची कोणती वैशिष्ट्ये सांगितली आहेत ?

II) वाहनांचा वेग वाढल्याने शरीरावर कोणते दुष्परिणाम होतात?

III) लेखक शिवराज गोर्ले यांनी खऱ्या आनंदाची कोणती लक्षणे सांगितली आहेत ?

IV) अनुचा घर सोडण्यामागचा विचार 'शोध' या कथेच्या आधारे थोडक्यात लिहा.

क) पुढीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे सुमारे 80 / 90 शब्दांत लिहा. **(4 X2=8)**

I) सौंदर्य जसं पाहणाऱ्याच्या दृष्टीत तसं आनंद घेणाऱ्याच्या वृत्तीत असतो.' असे काम्हटले आहे ?

II) आरंभी माणसे वाहनांवर मग वाहने माणसांवर स्वार होतात असे का म्हटले आहे ?

III) दातदुखीमुळे लेखकाचे आध्यात्मिक तत्त्वचिंतन कसे होते ?

IV) 'रेशीमबंध' या शीर्षकाची समर्पकता स्पष्ट करा.

प्रश्न 7 अ) : पद्य पाठांच्या आधारे योग्य पर्याय निवडून पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा. **(2X1=2)**

I) कवी बोरकरांनी वर्णिलेली '...कोमल पाचूची शेते' म्हणजे .....

A) वेळूची बेटे
B) फुललेला चाफा
C) फुलपाखरांचे पंख
D) शेतातील पिके

II) सुरेश भट लिखित 'रंग माझा वेगळा' ही एक .....

A) कविता आहे.
B) गज़ल आहे.
C) अभंग आहे.
D) टीवी मालिका आहे.

प्रश्न 7. ब) कोणत्याही <u>दोन प्रश्नांची</u> सुमारे 35/40 शब्दांत उत्तर लिहा. (2X2=4)

I) कवयित्री हिरा बनसोडे यांनी स्त्रीमध्ये जाणवलेले बदल कसे वर्णन केले आहेत?

II) ‘रोज मातीत’ या कवितेतील शेतकरी स्त्री कोणकोणती कामे करते?

III) कवी बा. भ. बोरकर आषाढ घनांना थांबायला का सांगत आहे ?

IV) ‘रंगुनी रंगात सार्‍या रंग माझा वेगळा’ असे कवी का म्हणतात ?

प्रश्न 7. क) पुढीलपैकी <u>एका प्रश्नाचे</u> उत्तर सुमारे 70/75 शब्दांत लिहा. **(4x1=4)**

I) पुढील काव्यपंक्तींचा संदर्भासह अर्थ स्पष्ट करा. –

‘उघड गगन, कर घडीभर आसर
आणि खुले कर वासरमणी-घर’
वाहू दे या तव किमयेवर
कोवळ्या नव्या हळदुव्या उन्हा

II) पुढील काव्यपंक्तीचा संदर्भासह आशय स्पष्ट करा.

‘नाही बेणं ग मन दाबते, बाई दाबते
कांड्याकांड्यानी संसार सांधते बाई सांधते

*******************